# देगलूर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**देगलूर / प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात असून देखील उच्च शिक्षणाचा दर्जा टिकवून सातत्याने यशाची परंपरा राखणारे ग्रामीण भागातील एकमेव महाविद्यालय म्हणून देगलूर महाविद्यालयाची सर्वदूर ओळख आहे. हे महाविद्यालय तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली करणारे एकमेव असे महाविद्यालय आहे .असे प्रतिपादन प्राचार्य डॉ मोहन खताळ यांनी केले.



लातूर विभागीय मंडळाकडून घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या देगलूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर होते.तर व्यासपीठावर सचिव शशिकांत चिद्रावार, कार्यकारणी सदस्य देवेंद्र मोतेवार ,रवींद्रआप्पा द्याडे , जनार्दन चिद्रावार यांची उपस्थिती होती. बारावीच्या वाणिज्य शाखेतील यशस्वी विद्यार्थी सर्वप्रथम आलेला अमोल गडपवार ,राजकोटवार राजू, कु.साक्षी दिवटीवाड . कला शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थीनी श्रीदेवी वारे ,योगेश तोटावाड, दत्ता तालीमकर तसेच विज्ञान शाखेतून बारावी वर्गात सर्वप्रथम आलेला आवेस दौलताबादी ,महंमद सुफीयान कु.शिवानी देशमुख यांचा त्यांच्या पालकांसोबत हार पुस्तक देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. प्रास्ताविकात उपप्राचार्य चमकुडे यांनी मार्गदर्शन करणाऱ्या सर्व क. म. शिक्षकांचा गौरव केला. सातत्याने मेहनत घेतल्यास यश आपोआप मिळते असे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक पालक तसेच अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षक प्रा. एस.एन.पाटील तर आभार प्रा.महेश कुलकर्णी कुडलीकर यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner